# नागपूर महानगरपालिका, नागपूर

(आस्थापना शाखा)

जाहिरात क्र./528/पी.आर दिनांक 01/10/२०२५

## थेटमुलाखत

नागपूर महानगरपालिकेत शहरामध्ये विविध ठिकाणी असलेले अनाधिकृत कचरा घराचे सर्वेक्षण करुन त्यांचे कायमस्वरुपीचे निराकरण करणे व स्वच्छतेवर देखरेख ठेवणे , कचरा संकलनाचा कामावर देखरेख ठेवणे, चोकेजच्या अडचणी सोडविण्याकरिता मदत करणे तसेच नाले सफाई व स्वच्छता संदर्भात इत्यादी कामावर देखरेख ठेवण्याकरिता घनकचरा व्यवस्थापन विभागातंर्गत **"घनकचरा व्यवस्थापन समन्वयक"**च्या पदावर कंत्राटी /करार तत्वावर शासन निर्णय १७ डिसेंबर, २०१६ व सुधारित शासन निर्णय दि. ०८/०९/२०२३ नुसार अनुज्ञेय मासिक पारिश्रमिक तत्वावर व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील तरतुदीनुसार करार पद्धतीने प्रथमत: ६ महिन्याच्या कालावधीकरिता थेट मुलाखतीद्वारे तात्पुरती नियुक्ती करावयाची आहे.

उक्त कामाचा अनुभव व पात्रता असलेल्या इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी थेट मुलाखती करीता आवश्यक कागदपत्रासह दि. १०/१०/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता, अतिरिक्त आयुक्त (शहर), सिव्हील लाईन मनपा नागपूर यांचे कार्यालय येथे उपस्थित राहावे.

| अ.क्र | पदाचे नाव | एकुण पद | वयोमर्यादा | पात्रता व अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | **"घनकचरा व्यवस्थापन समन्वयक"** | १ | कमाल ६५ वर्षे | १. कोणत्याही शाखेचा पदवी/पदविका<br>२.घनकचरा व्यवस्थापनाबाबतचा शासकीय/ निम्मशासकीय/ स्थानिक संस्था येथे मुख्य पदावर कार्य केल्याचा ३ वर्षाचा कामाचा अनुभव |

वरील पदाकरीता इच्छुक उमेदावारांनी दि. १०/१०/२०२५ रोजी सकाळी १०.३० ते १२.०० पर्यंतच्या दरम्यान आपले नाव नोंद करावे. विहीत वेळेनंतर येणाऱ्या उमेदवरांच्या नावाची नोंद करण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. पात्र अर्जदाराची मुलाखत त्याच दिवशी लगेच घेण्यात येईल.

अर्हता:-

१. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा.
२. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज अति. आयुक्त नागपूर महानगरपालिका, सिव्हील लाईन, नागपूर यांचेकडे सादर करावेत.
३. वयोमर्यादा विचारात घेतांना दि. १०/१०/२०२५ ही तारीख ग्राहय धरण्यात येईल.
४. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीचा मानधनापोटी होणारा खर्च **घनकचरा व्यवस्थापन विभाग,** आस्थापेवरुन काढण्यात येईल.
५. उमेदवारांनी त्यांच्या वय,शैक्षणिक पात्रता व अनुभवाच्या सर्व कागदपत्रांच्या छायाप्रती स्वसांक्षाकित करुन जोडाव्यात.
६. उमेदवारांनी अर्ज सादर करुन अर्जासोबत एक फोटो चिकटवावा व एक फोटो संलग्न करावा.
७. नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विविक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत व्यक्तीशी राहील. व तसे बंधपत्र/हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात येईल, तसेच सदर बंधपत्रात/हमीपत्रात करार पध्दतीने नियुक्ती देतांना शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरीक्त अटी व शर्ती, मान्य असल्याचे बंधपत्र/हमीपत्र उमेदवाराला दयावे लागेल.

८. करार पध्दतीवरील उमेदवारांना नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करता येणार नाही.

९. मासिक पारिश्रमिक-शासकीय/निमशासकीय सेवा- सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची विहीत कार्यपध्दतीचे पालन करुन करार पध्दतीने नेमणूक करतांना त्यांना अशा नियुक्तीच्या वेळी महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतनाएवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळून)त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल आणि एकदा निश्चित करण्यात आलेले पारिश्रमिक त्यांच्या करार पध्दतीने नियुक्तीच्या कालावधीसाठी कायम राहील.

१०. सेवानिवृत्त अधिकारी शारीरीक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

११. सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी, तसेच अर्जदाराविरुध्द कोणताही गुन्हा दाखल नसावा व चारित्र्य चांगले असावे.

उपरोक्त पदाकरिता अर्जविहीत नमुन्यातच सादर करावयाचा असून अर्जाचा नमूना व उक्त पदांकरिता आवश्यक अर्हता/अटी/शर्ती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर www.nmcnagpur.gov.in वर उपलब्ध आहे.

डॉ. अभिजीत चौधरी (भा.प्र.से)
आयुक्त तथा प्रशासक
महानगरपालिका, नागपूर

दिनांक :- / /२०२५